नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २७/०१/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील सेनी इंटरप्राईजेस कंपनी एमआयडीसी बोरी येथे दि. २५.०१.२२ चे २०.०० ते दि. २६.०१.२२ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– महेश रमेश खरोले, वय ३० वर्ष, रा.सुकळी बेलदार हे दि. २६/०१/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वा. कंपनीत आले असता कंपनी समोरील गेटची चैन तुटलेली दिसली कंपनीत उभी असलेली १) टाटाएस माल वाहु गाडी क्र. एम.एच–४७/वाय– ०५२८ कि. १२५,०००/–रु., कंपनीतील वर्कशाप मधील २) गेअर बॉक्स कि. ३०,०००/–रु., ३) मशीन गेअर कि, २०,०००/–रु., ४) हॉयड्रोलीक सिलेन्डर कि. ३०,०००/–रु., ५) २५ एम.एम. लोखंडी प्लॅट १५० किलो कि. ८,०००/–रु. ०६) कॉम्प्रेसर मशीन कि. ६,०००/–रु. व ७) चॅनल ऍंगल व इतर कंपनीतील सामान कि. १०,०००/–रु. असा एकुण कि. २,२९,०००/–रु. चा मुद्देमाल संशयीत आरोपी नामे– श्रीधर जगताप रा.सातगाव याने रात्री दरम्यान गाडी सह माल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रफुल मो.क्र. ८८०६८२८५६० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील उमरेड कऱ्हांडला अभयारण्य ठाणा बिटातील वाघाईच्या पाट मधील कक्ष क्र. १४१८ येथे दि. २४/०१/२०२२ चे १७.१५ ते दि. २५/०१/२०२२ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्री दिलीप श्रिरामजी वावरे वय ४६ वर्ष रा. प्लॉट नं. २२ चिचघरे लेआउट बायपास उमरेड व त्यांचे सहकारी हे जंगलात पायदळ पेट्रोलिंग करित असतांना पेट्रोलिंग दरम्यान ठाणा बिटातील वाघाईच्या पाट मधील कक्ष क्र. १४१८ वन्य प्राण्याच्या संरक्षणाकरिता लावण्यात आलेले ०२ ट्रॅप कॅमेरे दिसुन आले नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने हेतुपरस्पर जुने कॅमप्लाईज हिरव्यारंगाचे CUDDE BACK कंपनीचे ०२ ट्रॅप कॅमेरे ज्याची अंदाजे प्रत्येकी कि. ७,०००/– रू. नग प्रमाणे एकुण कि. १४,०००/–रू. किमतीचे कॅमेरे अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री पाटील हे करीत आहे.

# रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. बेला** :– अंतर्गत अर्धा कि.मी. अंतरावरील दांडवेच्या घरासमोर मेन रोडवर बेला येथे दिनांक २६/०१/२०२२ चे ०९.५५ वा. ते १०.२५ वा. दरम्यान एम.एच–४०/सी.ए– २८३९ क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉलीचा चालक आरोपी क्र. १. सुनिल हरिभाउ तेलरांधे, वय ३५ वर्ष, रा. बेला याने त्याचा ट्रॅक्टर मालक आरोपी क्र. २. कुणाल आंबादास मेंढुले, वय २४ वर्षे, रा. बेला याच्या सांगण्यावरून त्याचे ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या १ ब्रास रेती किं. ५,०००/–रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन रेती, मोबाईल कि. ५,०००/–रू. व वाहनासह एकुण १,१०,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार अजय चौधरी पो.स्टे. बेला यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. सहकलम १४६, १९६, १०४, १७७, ५०, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजय चौधरी मो.क्र. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**